# कोल्हापूर जिल्हा परिषद
# अर्थ समिती सभा क्रमांक - १२ /२०१६-१७

**वार - शुक्रवार** **वेळ - दु. १.०० वा.**

**दिनांक - ०३/०२/२०१७** **स्थळ - समिती सभागृह**

## -: कार्यवृत्तांत :-

अर्थ समिती जिल्हा परिषद कोल्हापूरची सभा गुरुवार दि. ०३/०२/२०१७ रोजी दु.१.०० वाजता श्री.वसंतराव नाईक सभागृह जि.प.कोल्हापूर येथे आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| **१. मा. श्री.अभिजित प्रभाकर तायशेटे** | **सभापती** |
| **२. मा. सौ.मंगल संजय कलिकते** | **सदस्या** |
| **३. मा. श्री. राजेश शांतगोंडा पाटील** | **सदस्य** |
| **४. मा. सौ.सुवर्णा संजय अपराज** | **सदस्य** |
| **५. मा. सौ.प्रिया प्रकाश वरेकर** | **सदस्य** |
| **६. मा. श्री.जयकुमार बाळाप्पा मुनोळी** | **सदस्य** |
| **७. मा.श्री.विलास आनंदा कांबळे** | **सदस्य** |
| **८. मा.श्री. तानाजी शांताराम पाटणकर** | **सदस्य** |
| **९. मा..सौ.सुप्रिया सुधाकर साळोखे** | **सदस्य** |

येणेप्रमाणे मा.सदस्य उपस्थित झालेनंतर गणपूर्ती झालेने सभेच्या कामकाजास सुरवात करणेबाबत मा.सभापती यांनी सुचित केले.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी -**आजच्या वित्त समितीच्या बैठकीस उपस्थित असेलेले मा.समिती सभापती व सदस्य महोदय तसेच वित्त विभाग व इतर विभागाकडील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करत आहे.

**श्री. पाटील उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी -** आदरणीय सभापती महोदय यांचे परवानगीने मी विषय पत्रिकेवरील विषयावरील कामकाजास सुरुवात करतो.

**विषय क्रमांक - १**

**मागील सभा दि. ०५/१/२०१७ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.**

**ठराव क्रमांक - ३४**

मागील सभा दि. ०५/०१/२०१७ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणेत यावा.

सुचक- श्री.विलास आनंदा कांबळे.
अनुमोदक-सौ.सुप्रिया सुधाकर साळोखे
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्रमांक - २**

**कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे जानेवारी २०१७ ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करुन अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणे.**

**ठराव क्रमांक - ३५**

**कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे जानेवारी २०१७ ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करणेत आलेली असुन अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.**

सुचक- जयकुमार बा.मनोळी
अनुमोदक-श्री.राजेश शां.पाटील
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्रमांक - ३**

**वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे ऑक्टोंबर २०१६ ते डिसेंबर २०१६ अखेर पुर्ण/अपूर्ण असलेबाबत अवलोकन करणे.**

<u>ठराव क्रमांक - २६</u>

**वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे ऑक्टोंबर २०१६ ते डिसेंबर अखेर पुर्ण/अपूर्ण असलेबाबत अवलोकन करणेत आले असुन त्यांना मान्यता देणेत येत आहे.**

सुचक - श्री.राजेश शां.पाटील
अनुमोदक- श्री.तानाजी शां.पाटणकर
ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विषय पत्रिकेवरील कामकाज व चर्चा झालेनंतर मा.सभापती यांनी उपस्थितांचे खालील प्रमाणे आभार मानले.

**<u>मा.सभापती -</u>**

आजच्या वित्त समितीला उपस्थित असणारे सन्माननीय सर्व सदस्य / सदस्या त्याचप्रमाणे सचिव श्री.देशपांडे साहेब व त्यांचा सहकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे उपस्थित इतर खात्याकडील अधिकारी व कर्मचारी यांनी आजच्या वित्त समितीचे सभा कामकाज चालविणेसाठी दिलेल्या सहकार्याबददल अर्थ समितीच्या वतीने मी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो. तसेच, पुढील सभेस सर्व खात्याकडील खर्चाची माहिती घेणेकामी सर्व सबंधीत अधिकारी वर्गास उपस्थित राहणेची सुचना करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

**सभा कार्यवृत्तांत वाचून कायम केला.** **दि.०३/०२/२०१७.**

**(अभिजित प्र.तायशेटे)**

**सचिव**
**अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

**सभापती**
**अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**